महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन कनिष्ठ गट (मुले) निवड चाचणी व मानके तयार करणे

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विद्याशाखे अंतर्गत शारीरिक शिक्षण विषयात पीएच.डी अंतर्गत पुर्ततेसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा संशोधन आराखडा मान्यतेस्तव सादर

संशोधक

प्रा.पल्लवी योगेश तरडे

शारीरिक शिक्षण विभाग

श्री सिध्दीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर, पुणे—५२

मार्गदर्शक

डॉ.अभिजित मोरे

शारिरीक शिक्षण विभाग

महात्मा फुले कॉलेज, अहमदपूर, लातूर

जुन २०१९

१. प्रस्तावना :–

आज सर्व क्षेत्रात खेळ व शारीरिक शिक्षणाला महत्व प्राप्त झाले असल्याचे दिसून येते. वाढते धकाधकीचे जीवन, बदलती जीवन शैली, यामुळे विविध रोग, आजार यांच्या भितीमुळे समाज त्यामार्गाकडे वळू लागला आहे. त्यामुळे चालणे, योग प्राणायाम याला महत्व येऊ लागले आहे.

त्याचप्रमाणे क्रिडा क्षेत्रातही विविध खेळामधील आवड, सहभाग, मिळणारे प्राविण्य, पैसा, प्रसिध्दी या विविध कारणामुळे क्रिडा क्षेत्रात प्रगती करू इच्छिणाऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढते आहे. शिक्षणाबरोबर आपले पाल्य कोणत्यातरी एखादया खेळात प्रविण असावे असे बऱ्याच पालकांना वाटू लागले आहे. त्यामुळे विविध क्रिडा प्रकार व त्यातील सहभागी खेळांडूची संख्या व त्यांच्यातील स्पर्धा ही वाढत जाताना दिसत आहे. यासाठी क्रिडा कार्यमान, कौशल्य वाढवण्याच्या दृष्टीने खेळाडू, पालक, प्रशिक्षण व मार्गदर्शक अधिक प्रयत्नशिल असल्याचे दिसून येते.

कोणत्याही खेळामध्ये उच्चतम स्तर गाठायचे असेल तर, शारिरीक सुद्‌ढतेबरोबर खेळातील कौशल्य विकसित करणे अत्यंत आवश्यक असते. विकसित केलेल्या कौशल्या मुल्यमापन हे एखादया कसोटी, स्पर्धेतील सहभाग व प्राविण्यानुसार ठरवता येते. बऱ्याच खेळामध्ये खेळांडूच्या निवडीसाठी विविध कसोटया, निवड चाचण्यांचा वापर मोठया प्रमाणावर होत असल्याने योग्य खेळांडूची निवड होण्यास मदत होते. असाच एक खेळ म्हणजे बॉल बॅडमिंटन ज्यामध्ये खेळांडूचा सहभाग मोठया प्रमाणावर वाढला असून, खेळाची लोकप्रियता ही राज्य, राष्ट्रीय स्पर्धेतील वाढलेल्या सहभागावरून दिसून येत आहे.

बॉल बॅडमिंटन खेळाला भारतामध्ये साधारण सतरा ते अठराव्या शतकाच्या दरम्यान सुरूवात झाली असल्याचे सांगितले जाते. ही सुरवात तामिळनाडू व केरळ इथल्या राजघराण्या मध्ये चेंडूफळी या क्रिडा प्रकारच्या नावाने ओळखला जात असत. त्यानंतर एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या काळात बॉल बॅडमिंटन हे नाव रतनलाल नावाचा तंजारवचा रहिवासी मद्रास येथे आला आणि त्याने नामशेष झालेला बॉल – बॅडमिंटनचा खेळ परत सुरु केल्याचे आढळते.

दक्षिण भारतात हा खेळ खुपच लोकप्रिय आहे. असे असले तरी सद्य स्थितीत बऱ्याच राज्यांचा राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग वाढलेला आहे. तशीच परिस्थती राज्यस्तरीय स्पर्धामध्ये होत आहे. इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रामध्येही पुर्वीपेक्षा सध्या मुले व मुलींच्या संघाच्या सहभागाच प्रमाण खुप वाढले आहे की, संयोजकांना या स्पर्धांचे नियोजन करणे अवघड जात आहे. त्यामुळे बॉल बॅडमिंटन खेळांचे सबज्युनिअर, ज्युनियर, सिनियर मुले – मुली स्पर्धा वेगवेगळया घेतल्या जात आहे.

बॉल बॅडमिंटन खेळाच्या नियमामध्ये बदल झाल्यापासून खेळाला वेग आला आहे. २४ मीटर लांब X १२ मीटर रूंद व ६ फुट उंच नेट असलेल्या आयताकृती मैदानात प्रत्यक्ष ५ खेळाडूंचा १ संघ (५ राखीव) मैदानात दुसऱ्या संघाविरूध्द, ३५ गुणांचे तीन सेट खेळतो. यासाठी बॉल बॅडमिंटन खेळाची लाकडी रॅकेट किंवा ग्राफाईट रॅकेटे, पिवळया लोकरीचा बॉल यांचा वापर केला जातो. १) फ्रन्ट, २) सेंटर, ३) बॅक अशी खेळाडूंची मैदानात स्थिती असते. सर्व्हिस, टॉसिंग, प्लेसिंग, पुशिंग, ब्लॉक, स्मॅश हे या खेळाचे कौशल्य आहेत.

वरील कौशल्यांबरोबर या खेळासाठी मनाची एकाग्रता असणे ही अत्यंत आवश्यक आहे.

मी स्वतः हा बॉल – बॅडमिंटन खेळाची राष्ट्रीय खेळाडू आहे. परंतू आज पर्यंत आमची निवड ही कोणत्याही कसोटयाव्दारे झाली नसून, फक्त स्पर्धेतील कार्यक्षमतेव्दारे होत होती. इतर खेळांप्रमाणे बॉल बॅडमिंटन खेळातील खेळाडूंची निवड प्रक्रियेलाही सुसुत्रबध्दता यावी यासाठी संशोधक बॉल बॅडमिंटन खेळातील कौशल्य कसोटयांची निर्मिती, निवडचाचणी व मानके तयार करण्याचा प्रस्तुत संशोधनात प्रयत्न करणार आहे.

२) संशोधन समस्येचे स्पष्टीकरण :–

'' बॉल बॅडमिंटन खेळाकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल, सहभागाचे वाढते प्रमाण पहता खेळाडू प्रशिक्षक, शिक्षक, मार्गदर्शक, संघटक यावर विद्यार्थ्यांच्या निवडीचा येणारा ताण, भार कमी व्हावा, विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दल आवड, शिक्षकांबद्दल आदर निर्माण व्हावा योग्य खेळांडूची संघामध्ये शिक्षक व प्रशिक्षकांव्दारे निवड व्हावी व खेडाळू निवड प्रक्रियेमध्ये सुसुत्रता येण्यासाठी संशोधकांने बॉल – बॅडमिंटन खेळातील कौशल्य कसोटया बनवून मानके तयार करण्याचे ठरवले आहे.

३)गरज व महत्व :–

१) कोणत्याही खेळामध्ये शारिरीक सुद्ढतेबरोबर कौशल्यांनाही तेवढच महत्व असल्याने विद्यार्थ्यांची शारिरीक सुद्ढता, कौशल्यांचे मापन, मुल्यमापन होणे आवश्यक होवू लागले आहे.

२) विद्यार्थ्यांना स्वतःची प्रगती होत आहे की नाही हे पाहण्यासाठी कसोटी व मानके यांची गरज भासू लागली आहे.

३) शाळेतील शिक्षक, प्राध्यापक यांना शाळेचा कॉलेजचा संघ निवडण्यासाठी अशा कसोटया व मानकांची मदत घेता येऊ शकते.

४) विविध संघामधून, मुलांमधून एकच संघ फायनल निवडण्यासाठी मार्गदर्शक, संघटक यांना कसोटी, निवड चाचण्या त्यांची मानके याचा उपयोग करून घेता येईल.

५) पक्षपाती पणा कमी होण्यासाठी सदर संशोधनाचा उपयोग होईल असे संशोधकाला वाटते.

६) संशोधक स्वतःहा या खेळाचा राष्ट्रीय खेळाडू असल्याने खेळाप्रती त्याचे योगदान म्हणून बॉल बॅडमिंटन खेळातील कसोटया व मानके तयार करण्याचे ठरवले आहे.

४) संदर्भ साहित्याचा आढावा : –

संदिप घिके (२०१४)

यांनी बॉल बॅडमिंटन खेळाच्या कौशल्य कसोटयांची निर्मिती केली आहे. यासाठी त्यांनी पुणे शहरातील १९ वर्षाखालील २० राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन मुले खेळाडूंची सहेतूक न्यादर्श पध्दतीने निवड करून पुर्व चाचणी घेतली. बॉल बॅडमिंटन खेळातील सर्व्हीस व वॉल वॉली या २ कसोटयाची निर्मिती करून त्यांची माहिती व प्रात्यक्षिक दाखवून प्रत्यक्ष चाचणी घेण्यात आली व नोंदी घेवून co-relation, co- efficient या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करून तयार करण्यात आलेल्या कसोटया वैध्य, विश्वसनिय व वस्तुनिष्ठ असल्याचे आढळून आले.

वाघचौरे माधुरी (२०००)

यांनी खो – खो खेळातील कौशल्य संच तयार केला आहे. यासाठी त्यांनी २००० मुले खेळाडूंची निवड केली होती. त्याचे वय ११ ते १४ वर्षे होते. एकूण १० घटकांचा कसोटी संच्यात समावेश केला होता. त्यासाठी Test – retest reliability, T- scale, Percentile या

संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला व मानके हे Five Point Likert Scale ने तयार करण्यात आले. या सर्वांवरून असे आढळून आले की, खो – खो खेळांडूसाठी तयार करण्यात आलेल्या कसोटी संच हा विश्वसनीय व वैध्य आढळून आला.

व्यंकट वांगवाड (२००१)

यांनी महाराष्ट्र कनिष्ठ गट व्हॉलीबॉल खेळाडूसाठीच्या निवडीची मानके तयार केली. यासाठी त्यांनी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ गट व्हॉलीबॉल संघटना राज्यस्तरिय स्पर्धेसाठी (१९९८) साली आलेल्या एकूण २० संघातील एकूण सर्व २७२ खेळाडूंचा संशोधनासाठी समावेश करण्यात आला. सर्वांना निवड चाचणीतील कसोटया विषयी माहिती देण्यात आली. संशोधनासाठी तीन घटकांचा अभ्यास करण्यात आला होता.

अ) शारिरीक घटक, ब) सुद्ढता घटक, क) व्हॉलीबॉल कौशल्य घटक, या घटकांच्या प्रत्यक्ष कसोटया घेवून माहिती वैध्य, विश्वसनिय व वस्तुनिष्ठ असल्याचे संख्याशास्त्रीय विश्लेषणाव्दारे आढळून आले.

मोरताटे रघुनाथ (२०१८)

यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड बॉल बॅडमिंटन विद्यापीठ संघ निवड चाचणी व मानके तयार केली. यासाठी त्यांनी तीन घटकांनचा अभ्यास केलाण अ) शारिरीक ठेवण, ब) शारिरीक तंदुरूस्तीचे घटक, क) बॉल बॅडमिंटन खेळाचे कौशल्य यांच्या कसोटया तयार करून जवळच्या चार जिल्हातून आंतरमहाविद्यालयीन, आंतरविद्यापीठ, राज्यस्तरीय खुल्या स्पर्धा, खुल्या राष्ट्रीय स्पर्धेत खेळणारे बॉल बॅडमिंटन खेळाडू यांची वर्गबध्द नमुना निवड पध्दतीव्दारे २००८ ते २०११ या शैक्षणिक वर्षातील १८ ते २५ वयोगटातील मुले खेळाडूंची संशोधना करिता निवड करण्यात आली. तयार केलेल्या कसोटया वैध्य, विश्वसनीय व वस्तुनिष्ठ असल्याने त्याची माहिती व प्रशिक्षण खेळाडूंना देवून प्रत्यक्ष कसोटया घेवून माहिती मिळवण्यात आली. प्रश्नावलीव्दारे आलेल्या प्रतिक्रियांचे प्राधान्य करून तक्ते तयार केले. त्यावरून एकूण व टक्केवारी काढून प्रथ्थकरण केले व त्याव्दारे अर्थनिर्वाचन करून विश्लेषण करण्यात आले. व मानके तयार करण्यात आली.

५) संशोधनाची उद्‌दीष्टे :–

संशोधकाच्या मते प्रस्तुत संशोधन समस्येची खालील उद्‌दीष्टे आहेत.

१) महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन कनिष्ठ गटासाठी आवश्यक चलांचे मापन करणे. (शारिरीक ठेवण, शारिरीक क्षमता/सुदृढता घटक व बॉल – बॅडमिंटन खेळातील कौशल्ये)

२) महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन कनिष्ठ गटाचा संघ निवडण्यासाठी आवश्यक अशा बॉल – बॅडमिंटन खेळातील कौशल्याच्या कसोटयाची निर्मिती करणे.

३) बॉल बॅडमिंटन खेळातील कसोटयाचे मापन व मुल्यमापनाच्या आधारे महाराष्ट्र राज्य कनिष्ठ गटाचा संघ निवडण्यासाठी बॉल बॅडमिंटन खेळ कौशल्य कसोटयांची मानके तयार करणे.

४) महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन संघातील खेळाडूंच्या निवडीसाठी योग्य निकर्षाबाबत मार्गदर्शन करणे.

६) परिकल्पना :–

H1 - महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन कनिष्ठ गट निवडीसाठी तयार करण्यात येणाऱ्या कौशल्ये कसोटया व मानके वैध्य, विश्वसनिय व प्रमाणित असतील.

७) गृहितके :–

१) कसोटयांच्या निर्मितीसाठी खेळाडूचा योग्य प्रतिसाद मिळेल.
२) सहभागी खेळाडू स्वतःची क्षमता व कौशल्ये योग्य प्रकारे सादर करतील.
३) तयार करण्यात आलेल्या कसोटया व मानकाव्दारे खेळांडूची संघामध्ये निवड करण्यास मदत होईल.

८) व्याप्ती :–

१) सदर संशोधन हे महाराष्ट्र राज्यातील १९ वर्षाखालील बॉल बॅडमिंटन खेळाडू मुले यांच्यापुरते मर्यादित आहे.

२) सदर संशोधन हे बॉल बॅडमिंटन खेळामध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडू पुरते मर्यादित आहे.

३) सदर संशोधन हे बॉल बॅडमिंटन खेळाडूंच्या निवडीसाठी आवश्यक चलांच्या अभ्यासापुरते मर्यादित आहे. (खेळांडूची शारिरीक ठेवण, शारिरीक क्षमता व खेळातील कौशल्य क्षमता)

४) सदर संशोधन हे बॉल बॅडमिंटन खेळाडूंच्या निवडक कौशल्य कसोटयाची निर्मिती करून त्यांची प्रमाणित मानके, तयार करून महाराष्ट्र राज्यातील कौशल्यपुर्ण बॉल – बॅडमिंटन खेळाडूंची निवड करण्यास मदत करण्यापुरते मर्यादित आहे.

९) मर्यादा :-

१) प्रस्तुत संशोधनास सहभागी होणारे खेळाडू हे महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हातून असल्याने त्यांच्या भौगोलिक स्थिती, आहार, दैनंदिन दिनचर्या, सराव, उपजत क्षमता, अनुवंशिकता इ. घटकांवर संशोधकाचे नियंत्रण असणार नाही.

२) खेळांडूच्या सामाजिक, आर्थिक, मानसिक स्थितीवर संशोधकाचे नियंत्रण असणार नाही.

३) कसोटी मापनासाठी प्रशिक्षित मदतनीसाव्दारे माहिती गोळा केली गेली तरी त्यांच्या विश्वसनियतेवर संशोधकाची मर्यादा असणार नाही.

४) सदर संशोधनातील कसोटी निर्मितीतून प्रमाणित मानके तयार केली असली तरी जास्त न्यादर्शचा वापर केल्यास अजून प्रमाणित मानके मिळू शकतील.

१०)कार्यात्मक व्याख्या :-

- **कनिष्ठ गट : –**

बॉल बॅडमिंटन खेळामधील १७ ते १९ वर्षे वयोगटातून जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये सहभागी खेळाडू मुले होय.

- **निवड चाचणी : –**

बॉल बॅडमिंटन खेळासाठी आवश्यक शारिरीक ठेवण, शारिरीक सुदृढता घटक, खेळातील कौशल्य या चलांचे मापन, मुल्यामापन व मानके तयार करणे.

- **मानके : –**

बॉल बॅडमिंटन राज्यस्तरीय खेळाडू निवडीसाठी आवश्यक चलांच्या मापन, मुल्यमापनाव्दारे, प्रमाणित गुणांचा तक्ता तयार करून मार्गदर्शक तत्वे सादर करणे.

- **बॉल बॅडमिंटन खेळ : –**

लाकडी बॅट किंवा ग्रॅफाईड बॅट व पिवळा लोकरीचा चेंडू याच्या सहाय्याने दोन्ही संघातून प्रत्येकी ५ खेळाडू, २४ मी लांब तर १२ मी. रूंद व ६ फुट नेट असलेल्या मैदानात ३५ गुणांचे ३ सेट खेळले जातात. त्यामध्ये टॉसिंग स्मश सर्व्हीस पुशींग ही कौशल्य असतात. त्याला बॉल बॅडमिंटन खेळ असे म्हणतात.

११) संशोधनाची पध्दती : –

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केलेला अहे.

१२) न्यादर्शन

१२.१ जनसंख्या : –

प्रस्तुत संशोधनासाठीची एकूण जनसंख्या ही महाराष्ट्र राज्यातील बॉल बॅडमिंटन खेळातील १७ ते १९ वर्षे वयोगटातून जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणारी सर्व मुले ही आहेत.

१२.२ न्यादर्श : –

मोठया समुहातून छोटया समुहाबद्दल निष्कर्ष माडण्यांच्या अभ्यास पध्दतीचा न्यादर्श निवडणे असे म्हणतात.

प्रस्तुत संशोधनासाठी विचारात घेतलेल्या जनसंख्येतून सहेतूक न्यादर्श निवड पध्दतीनुसार महाराष्ट्र राज्य संघटनेव्दारे आयोजित बॉल बॅडमिंटन कनिष्ठ गट मुले राज्य स्तरीय स्पर्धेसाठी सहभागी झालेल्या विविध जिल्हांच्या संघातून स्पर्धेसाठी आलेल्या सर्व मुलांचा न्यादर्श म्हणून विचार केला जाईल. (अंदाजे ३० संघ = ३०० मुले)

सलग दोन वर्षे या स्पर्धेसाठी सहभागी होणा–या खेळाडू मुलांचा न्यादर्श म्हणून वापर करण्यात येईल.

१३) संशोधनाची साधने : –

महाराष्ट्र राज्य बॉल – बॅडमिंटन कनिष्ठ गटातील मुलांची निवड करण्यासाठी खालील चलांचा म्हणजे साधनांचा अभ्यास केला जाईल.

	घटक	**संशोधनाची चले**	**संशोधन साधने / कसोटया**
अ)	**शारिरीक ठेवण**	१) वजन (KG)	डिजीटल वजन काटा
		२) उंची (CM)	मीटर टेप (सें.मी.)
		३) BMI	BMI (सुत्र)
ब)	**शारिरीक सुदृढतेचे घटक**	१) वेग	५० मीटर डॅश
		२) ताकद	मेडीसीन बॉल थ्रो
		३) दिशा भिमुखता	साईड स्टेप टेस्ट
क)	**बॉल बॅडमिंटन खेळाचे कौशल्य**	१) सर्व्हिस	सर्व्हिस टेस्ट
		२) टॉसिंग	टॉसिंग टेस्ट
		३) पुश	पशु टेस्ट
		४) हिट	हिट टेस्ट
		५) बॉल उचलणे	रिसिव्ह टेस्ट

वरील बॉल – बॅडमिंटन खेळाचे कौशल्य कसोटया तयार केल्या जावून त्यांची विश्वसनियता तपासली जाईल.

६) संशोधनाची कार्यपध्दती : –

सदर संशोधनात महाराष्ट्र राज्यातील कनिष्ठ गट बॉल बॅडमिंटन मुले खेळाडू यांच्या निवडीसाठी कौशल्य कसोटयाची निर्मिती करण्यात येईल. त्या कसोटयाची विश्वसनियता, वैध्यता तपासल्यानंतर न्यादर्श म्हणून निवडलेल्या मुलांना कसोटयाबद्‌दलची माहिती देण्यात येईल. प्रात्यक्षिक दाखवून प्रत्यक्ष कसोटया घेण्यात येतील. आलेल्या माहितीवरून सक्रिय साधनाचा वापर करून मुल्यमापन व विश्लेषण करण्यात येईल व प्रमाणित मानके तयार करण्यात येतील. त्यानंतर कनिष्ठ गट मुले निवडण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येईल.

१५) पथदर्शी अभ्यास : –

१) कसोटयाची उद्‌दिष्टये व आराखडा निश्चित करणे.

२) कसोटी घटकांची निवड करणे.

३) कसोटीसाठी लागणाऱ्या साहित्यांची जमवाजमव करणे.

४) कसोटीची पध्दती प्रस्तापित करणे.

५) प्रत्यक्ष कसोटी घेवून नोंदी करणे.

६) कसोटयांची विश्वसनियता, वस्तुनिष्ठता वैध्यता तपासणे.

७) प्रत्यक्ष कसोटी राबवणे.

८) मापन, मुल्यामापन व विश्लेषण करणे.

९) मानके तयार करणे.

१०) मार्गदर्शक तत्वे मांडणे.

१६) संख्याशास्त्रीय साधने : –

प्रस्तुत संशोधनात संशोधन माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक सांख्किकतील मध्यमान, प्रमाणविचलण, सहसंबध गुणक, टक्केवारी या सांखिकीय साधनांचा वापर केला जाईल.

१७) संदर्भ सुची : –

पटेल पी.के.(१९९२), बॉल बॅडमिंटन कला, नियम व कौशल्ये, दिप्ती प्रकाशन, पुणे.

वांगवाड, व्यं, तिवारी, शं. (२००६), शारिरीक शिक्षण, मापन व मुल्यामापन, डायमंड प्रकाशन, पुणे.

आहेर, श.शं. (२००९), शारिरीक शिक्षण, मापन व मुल्यामापन, डायमंड प्रकाशन, पुणे.

रणजित कुमार (२०१८) संशोधन पध्दती, नवोदिता करिता क्रमवार मार्गदर्शक सेज पब्लीकेशन.

शारिरीक शिक्षण, (२०११), प्रगती बुक्स प्रा.लि.पुणे .

(संशोधक) (मार्गदर्शक)